प्रती,

**मा. जनसंपर्क अधिकारी सो.**
**पोलीस आयूक्त कार्यालय, पुणे. शहर**

**प्रतीवेदक** - एस. जे. शेंडगे, पोलीस उप-निरीक्षक, दिघी पोलीस स्टेशन, पुणे

**विषय** :- बेवारस मयताची माहिती स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, दिघी पोलीस स्टेशन, अक. मयत रजि. नं. ९५/२०१८, सी.आर.पी.सी. १७४ दि. ३०/०७/२०१८ मधील मयत अनोळखी पुरुष, वय अंदाजे ५५ वर्षे हा दि. २४/०७/२०१८ रोजी विश्वशांती केंद्र, इंद्रायणी नदीशेजारी आळंदी देवाची, ता. हवेली, जि. पुणे येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यास उपचारकामी ससुन हॉस्पीटल, पुणे येथे ॲडमीट केले असता तो दि. २९/०७/२०१८ रोजी २२.३० वा. मयत झाला आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे. -

एक अनोळखी पुरुष, वय अंदाजे ५५ वर्षे, नाव - पत्ता माहित नाही. शरीरबांधा सडपातळ, उंची ५ फुट २ इंच, रंगाने गहुवर्ण, चेहेरा - उभट, ओठ - सर्वसाधारण, नाक - सरळ, मिशी - पांढरी राखलेली, दाढी - वाढलेली पांढरी, केस - पांढरे, अर्धवट टक्कल, कपाळ - रुंद, आजारी दिसत असलेला, अंगावर - कांबळ असलेला.

येणेप्रमाणे वर्णनाच्या बेवारस मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी व तपासकामी बेवारस मयताच्या वर्णनाची माहीती स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द होणेस विनंती आहे.